# दीपस्तंभ फाउंडेशन – मनोबल राष्ट्रीय प्रवेश परीक्षा २०२६

## नेहमी विचारले जाणारे प्रश्न (FAQ)

### १. सामान्य माहिती आणि पात्रता

**प्रश्न १: मनोबल राष्ट्रीय प्रवेश परीक्षा म्हणजे काय?**

मनोबल राष्ट्रीय प्रवेश परीक्षा ही दीपस्तंभ फाउंडेशनतर्फे वंचित आणि गरजू पार्श्वभूमीतील हुशार विद्यार्थ्यांना शोधून त्यांना शैक्षणिक संधी, शैक्षणिक मार्गदर्शन, मेंटॉरिंग आणि शिष्यवृत्ती सहाय्य प्रदान करण्यासाठी आयोजित केली जाते.

- मिळणारे सहाय्य: निवडलेल्या उमेदवारांना त्यांच्या प्रवर्ग (Category), आर्थिक परिस्थिती आणि अंतिम निवडीच्या आधारे प्रशिक्षण (Coaching), निवासी सुविधा, तंत्रज्ञान सहाय्य, शैक्षणिक मदत आणि करिअर मार्गदर्शन मिळू शकते.

**प्रश्न २: अर्ज करण्यासाठी कोण पात्र आहे?**

- सामाजिक प्रवर्ग: खालीलपैकी कोणत्याही प्रवर्गातील विद्यार्थी अर्ज करू शकतात:
  - दिव्यांग विद्यार्थी (PwD)
  - अनाथ विद्यार्थी (Orphan)
  - तृतीयपंथी विद्यार्थी (Transgender)
  - अल्प उत्पन्न गट (LIG) मधील विद्यार्थी
- शैक्षणिक पात्रता: ज्या विद्यार्थ्यांनी इयत्ता १२ वी, पदवी (Graduation), किंवा पदव्युत्तर पदवी (Post-Graduation) पूर्ण केली आहे किंवा ते करत आहेत आणि स्पर्धा परीक्षा किंवा उच्च शिक्षणाची तयारी करत आहेत, ते अर्ज करण्यास पात्र आहेत.
- प्रादेशिक पात्रता: भारतातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील विद्यार्थी या परीक्षेसाठी पात्र आहेत.

**प्रश्न ३: नोंदणी किंवा परीक्षा शुल्क आहे का?**

- नाही. अर्ज प्रक्रिया आणि प्रवेश परीक्षा पूर्णपणे मोफत आहे.

**प्रश्न ४: अल्प उत्पन्न गट (LIG) चे निकष काय आहेत?**

गुणवत्तापूर्ण शिक्षणापासून वंचित ठेवणारी खरी आर्थिक अडचण असलेला कोणताही विद्यार्थी 'LIG' प्रवर्गांतर्गत अर्ज करू शकतो. निवडीनंतर, विद्यार्थ्यांच्या वास्तविक आर्थिक परिस्थितीनुसार त्यांचे वर्गीकरण खालील गटांत केले जाते:

| **गरजेचा गट** | **मिळणाऱ्या सुविधांचा तपशील** |
|---|---|
| **गट अ (उच्च गरज - High Need)** | यामध्ये निवास, भोजन, प्रशिक्षण, पुस्तके आणि परीक्षा शुल्क यासारख्या संपूर्ण सुविधांचा समावेश असू शकतो. |
| **गट ब (मध्यम गरज - Moderate Need)** | यामधील खर्च अंदाजे पुढीलप्रमाणे विभागला जातो: **५०% मनोबलतर्फे** आणि **५०% विद्यार्थ्यांद्वारे**. |
| **गट क (मर्यादित गरज - Limited Need)** | यामध्ये मोफत शैक्षणिक सहाय्य आणि प्रशिक्षण दिले जाते; तर निवास, भोजन, पुस्तके आणि परीक्षा शुल्क यासारखा खर्च विद्यार्थ्याला स्वतः करावा लागतो. |

- मूल्यमापनाचे निकष: कौटुंबिक उत्पन्न, घराची परिस्थिती, पालकांचा व्यवसाय, मालमत्ता आणि साधने, तसेच एकूण आर्थिक परिस्थिती.

## २. समाविष्ट परीक्षा आणि महत्त्वाच्या तारखा

**प्रश्न ५: मनोबल २०२६ अंतर्गत कोणत्या परीक्षांचा समावेश होतो?**

हा कार्यक्रम खालील परीक्षांची तयारी करणाऱ्या उमेदवारांसाठी तयार केला आहे:

- UPSC नागरी सेवा (Civil Services)
- महाराष्ट्र राज्य सेवा (MPSC State Services), MPSC गट ब व गट क (Group B & C), आणि सरळ सेवा / सारलसेवा
- इतर राज्य PCS परीक्षा
- बँकिंग परीक्षा (Banking Exams), SSC, आणि RRB
- MBA प्रवेश परीक्षा, Law CET, आणि इतर उच्च शिक्षण प्रवेश परीक्षा

**प्रश्न ६: परीक्षा कधी घेतल्या जातील?**

- परीक्षा १ – ५ जून २०२६ (शुक्रवार)

    - *कोणासाठी:* UPSC, महाराष्ट्र राज्य सेवा, इतर राज्य PCS, बँकिंग, SSC, RRB आणि उच्च शिक्षणाची तयारी करणारे उमेदवार.
- परीक्षा २ – २१ जून २०२६ (रविवार)
    - *कोणासाठी:* MPSC गट ब, MPSC गट क आणि सरळ सेवा.

परीक्षा वेळ (दोन्ही तारखांसाठी लागू):

- रिपोर्टिंग वेळ (हजेरीची वेळ): सकाळी ०९:३० वाजता
- परीक्षेची वेळ: सकाळी १०:०० ते दुपारी १२:०० वाजेपर्यंत
- *नोंद: उमेदवारांनी परीक्षा सुरू होण्याच्या किमान ३० मिनिटे आधी केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे. उशिरा येणाऱ्यांना प्रवेश दिला जाणार नाही.*

ऑनलाइन परीक्षा (आवश्यक असल्यास)
पहिल्या फेरीच्या परीक्षा आणि मुलाखती पूर्ण झाल्यानंतर काही जागा रिक्त राहिल्यास, मनोबल अतिरिक्त ऑनलाइन प्रवेश परीक्षा घेऊ शकते. ही सुविधा केवळ अशा उमेदवारांसाठी उपलब्ध असेल जे योग्य कारणांमुळे (उदा. महाविद्यालयीन परीक्षा असणे, जवळ परीक्षा केंद्र नसणे किंवा वैद्यकीय आपत्कालीन परिस्थिती) ऑफलाइन परीक्षेला उपस्थित राहू शकले नाहीत. याचा अंतिम निर्णय पूर्णपणे मनोबलच्या अखत्यारीत राहील.

## ३. परीक्षेची पद्धत आणि लेखनिकाबाबत तरतुदी

**प्रश्न ७: परीक्षा कशी घेतली जाईल?**

ही परीक्षा भारतातील नियुक्त ऑफलाइन केंद्रांवर खालील पद्धतीने घेतली जाईल:

- डोळ्यांनी पाहू शकणारे (Sighted) उमेदवार: छापील प्रश्नपत्रिका आणि OMR उत्तरपत्रिका.
- दृष्टिबाधित (Visually Impaired) उमेदवार: अ‍ॅक्सेसिबल (Accessible) गुगल फॉर्म. यासाठी उमेदवारांनी स्वतःचा मोबाईल फोन, टॅबलेट किंवा लॅपटॉप वापरणे आवश्यक आहे.

महत्त्वाची नोंद:
फक्त दृष्टिबाधित उमेदवारांनीच स्वतःचे डिव्हाइस (मोबाईल/लॅपटॉप) आणणे आवश्यक आहे. गुगल फॉर्मद्वारे परीक्षा देणाऱ्या उमेदवारांसाठी स्थिर इंटरनेट कनेक्शन असणे अनिवार्य आहे. मनोबल परीक्षेसाठी मोबाईल, लॅपटॉप किंवा इंटरनेट सुविधा पुरवणार नाही.

**प्रश्न ८: दृष्टिबाधित उमेदवारांसाठी कोणत्या सुविधा उपलब्ध आहेत?**

- दृष्टिबाधित उमेदवार स्क्रीन रीडर आणि टॉकबॅक (TalkBack) किंवा व्हॉइसओव्हर (VoiceOver) सारख्या सहाय्यक तंत्रज्ञानाचा वापर करून स्वतःच्या साधनांद्वारे परीक्षा देतील.
- अतिरिक्त वेळ: पात्र दिव्यांग उमेदवारांना लागू मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रति तास २० मिनिटांचा भरपाई वेळ (Compensatory time) मिळेल.

- सोबत आणायच्या गोष्टी: मोबाईल/टॅबलेट/लॅपटॉप, चार्जर, पॉवर बँक, हेडफोन/इयरफोन आणि स्थिर इंटरनेट डेटा प्लॅन.

**प्रश्न ९: लेखनिक (Scribe) घेण्याची परवानगी आहे का?**

- सामान्यतः नाही. बहुतांश दृष्टिबाधित उमेदवार स्क्रीन रीडरच्या साहाय्याने गुगल फॉर्मद्वारे स्वतंत्रपणे परीक्षा देऊ शकतात.
- अपवाद: अत्यंत अपवादात्मक प्रकरणांमध्ये, जेथे दोन्ही हातांवर परिणाम करणाऱ्या गंभीर अपंगत्वामुळे स्वतंत्रपणे परीक्षा देणे अजिबात शक्य नाही, तेथे लेखनिकाची परवानगी दिली जाऊ शकते.

## ४. प्रवर्ग वर्गीकरण (बेसिक विरुद्ध अ‍ॅडव्हान्स्ड)

**प्रश्न १०: बेसिक आणि अ‍ॅडव्हान्स्ड उमेदवारांसाठी वेगवेगळ्या परीक्षा असतील का?**

- होय. बेसिक आणि अ‍ॅडव्हान्स्ड प्रवर्गासाठी वेगवेगळ्या प्रश्नपत्रिका आणि स्वतंत्र कट-ऑफ (Cut-offs) लागू असतील. उमेदवार केवळ त्यांच्या संबंधित प्रवर्गातच स्पर्धा करतील.

**प्रश्न ११: मी बेसिक की अ‍ॅडव्हान्स्ड प्रवर्गात येतो हे मला कसे समजेल?**

- बेसिक प्रवर्ग (Basic Category): ज्या उमेदवारांनी अजून स्पर्धा परीक्षांची गांभीर्याने तयारी सुरू केलेली नाही किंवा ज्यांना तयारी सुरू करून एक वर्षापेक्षा कमी काळ झाला आहे.
- अ‍ॅडव्हान्स्ड प्रवर्ग (Advanced Category): ज्या उमेदवारांनी स्पर्धा परीक्षांची गांभीर्याने तयारी सुरू करून एक वर्षापेक्षा जास्त काळ झाला आहे.

पडताळणीबाबत महत्त्वाची सूचना:

मुलाखत प्रक्रियेदरम्यान उमेदवाराने निवडलेल्या प्रवर्गाची वय, शैक्षणिक पात्रता, शैक्षणिक टाइमलाइन आणि मागील परीक्षेचे प्रयत्न या आधारे पडताळणी केली जाईल. चुकीची माहिती दिल्यास किंवा जाणूनबुजून अयोग्य प्रवर्ग निवडल्यास उमेदवारी रद्द होऊ शकते, प्रवेश मागे घेतला जाऊ शकतो किंवा भविष्यातील सर्व संधींवर बंदी घातली जाऊ शकते.

## ५. तपशीलवार अभ्यासक्रम आणि परीक्षेचे स्वरूप

**प्रश्न १२: UPSC / महाराष्ट्र राज्य सेवा / इतर राज्य PCS**

A. बेसिक प्रवर्ग (Basic Category)

- भाषा पर्याय: इंग्रजी-हिंदी (द्विभाषिक) किंवा इंग्रजी-मराठी (द्विभाषिक)
- कालावधी: २ तास | एकूण प्रश्न: १२० | एकूण गुण: २४०
- अभ्यासक्रम:
    - *इयत्ता १२ वी NCERT पातळी:* इतिहास, राज्यशास्त्र, भूगोल, विज्ञान, अर्थशास्त्र.

    - *इयत्ता १० वी पातळी:* गणित, बुद्धिमत्ता (Reasoning), इंग्रजी भाषा.

B. ॲडव्हान्स्ड प्रवर्ग (Advanced Category)

- भाषा पर्याय: इंग्रजी-हिंदी (द्विभाषिक) किंवा इंग्रजी-मराठी (द्विभाषिक)
- कालावधी: २ तास | एकूण प्रश्न: १०० | एकूण गुण: २००
- स्वरूप: ८० सामान्य अध्ययन (GS) प्रश्न आणि २० CSAT प्रश्न. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. गुणवत्ता यादी ठरवताना CSAT च्या गुणांचाही विचार केला जाईल. हा पेपर पूर्णपणे UPSC नागरी सेवा पूर्व परीक्षेच्या अभ्यासक्रमावर आधारित असेल.

**प्रश्न १३: बँकिंग / SSC / RRB उमेदवारांसाठी अभ्यासक्रम**

A. बेसिक प्रवर्ग (Basic Category)

- भाषा: इंग्रजी-हिंदी (द्विभाषिक)
- कालावधी: १२० मिनिटे (संयुक्त वेळ) | एकूण प्रश्न: १२० | एकूण गुण: १२०
- स्वरूप: १. इंग्रजी भाषा – २५ प्रश्न
- २. क्वांटिटेटिव्ह ॲप्टिट्युड (गणित) – २५ प्रश्न
- ३. लॉजिकल रिझनिंग (बुद्धिमत्ता) – ३५ प्रश्न
- ४. सामान्य ज्ञान / संगणक जागरूकता / किरकोळ – ३५ प्रश्न
- *नोंद: या पेपरची काठिण्य पातळी तुलनेने कमी असेल. हा पेपर MBA प्रवेश परीक्षा, Law CET आणि इतर उच्च शिक्षण प्रवेश परीक्षांसाठीही लागू आहे.*

B. ॲडव्हान्स्ड प्रवर्ग (Advanced Category)

- भाषा: इंग्रजी-हिंदी (द्विभाषिक)
- कालावधी: १२० मिनिटे (संयुक्त वेळ) | एकूण प्रश्न: १२० | एकूण गुण: १२०
- स्वरूप:
- १. इंग्रजी भाषा – २५ प्रश्न
- २. क्वांटिटेटिव्ह ॲप्टिट्युड (गणित) – २५ प्रश्न
- ३. लॉजिकल रिझनिंग (बुद्धिमत्ता) – ३५ प्रश्न
- ४. सामान्य ज्ञान / संगणक जागरूकता / किरkoळ – ३५ प्रश्न

**प्रश्न १४: MPSC गट ब, गट क आणि सरळ सेवा**

A. बेसिक प्रवर्ग (Basic Category)

- भाषा: इंग्रजी-मराठी (द्विभाषिक)
- कालावधी: १ तास | एकूण प्रश्न: १०० | एकूण गुण: १००
- अभ्यासक्रम: इयत्ता १२ वी महाराष्ट्र राज्य मंडळ पातळीपर्यंत (इतिहास, राज्यशास्त्र, भूगोल, विज्ञान, अर्थशास्त्र) आणि इयत्ता १० वी पातळी (गणित, बुद्धिमत्ता, इंग्रजी भाषा).

B. ॲडव्हान्स्ड प्रवर्ग (Advanced Category)

- भाषा: इंग्रजी-मराठी (द्विभाषिक)
- कालावधी: १ तास | एकूण प्रश्न: १०० | एकूण गुण: १००
- अभ्यासक्रम: हा पेपर MPSC गट ब आणि गट क च्या वास्तविक संयुक्त परीक्षा अभ्यासक्रम आणि अधिकृत स्वरूपावर (Pattern) आधारित असेल.

## ६. निवड प्रक्रिया आणि परीक्षेच्या दिवसाचे नियम

**प्रश्न १५: अंतिम निवडीसाठी लेखी परीक्षेचे गुण विचारात घेतले जातील का?**

- नाही. लेखी परीक्षा केवळ उमेदवारांना मुलाखतीसाठी शॉर्टलिस्ट करण्यासाठी घेतली जाते. अंतिम निवड पूर्णपणे मुलाखतीतील कामगिरीवर आधारित असते.

**प्रश्न १६: अंतिम निवड कशी केली जाते?**


मुलाखतीदरम्यान खालील गोष्टींचे मूल्यांकन केले जाते:

- माहितीची सत्यता (Authenticity) आणि पार्श्वभूमी
- आर्थिक आणि वैयक्तिक परिस्थिती
- शैक्षणिक पार्श्वभूमी
- तयारीचे गांभीर्य आणि एकंदरीत योग्यता

**प्रश्न १७: मी माझे परीक्षा केंद्र कसे निवडू शकतो?**

1. परीक्षेच्या अंदाजे ५ दिवस आधी, उमेदवारांना व्हॉट्सॲपवर केंद्र निवडीसाठी गुगल फॉर्मची लिंक मिळेल.
2. उमेदवारांनी ती लिंक उघडून आपले पसंतीचे केंद्र निवडून दिलेल्या वेळेत फॉर्म सबमिट करावा.
3. जागांच्या उपलब्धतेनुसार केंद्र दिले जाईल. वेळेत फॉर्म न भरल्यास केंद्र देण्याचा अधिकार मनोबल व्यवस्थापनाकडे राहील.

**प्रश्न १८: ५ जून २०२६ च्या परीक्षेसाठी कोणती परीक्षा केंद्रे आहेत?**

1. 


| केंद्र | | पत्ता |
|---|---|---|
| 1. दिल्ली | - | Vision IAS, करोल बाग मेट्रो, नवी दिल्ली |
| 2. दिल्ली | - | Vision IAS, जीटीबी नगर मेट्रो, दिल्ली |
| ३. चंदीगड | - | Vision IAS, सेक्टर 25डी, चंदीगड |
| ४. जम्मू | - | Wings Ek Udaan, गांधी नगर, जम्मू |
| 5. जयपूर | - | Vision IAS, अपेक्स मॉल, टोंक रोड, जयपुर |
| ६. जोधपूर | - | Vision IAS, भास्कर सर्कल, रतानाडा, जोधपूर |
| 7. लखनऊ | - | Vision IAS, अलीगंज, Lucknow |
| ८. प्रयागराज | - | Vision IAS, सिव्हिल लाइंन्स, प्रयागराज |
| ९. वाराणसी | - | बनारस हिंदू युनिव्हर्सिटी (BHU), वाराणसी |
| १०. अहमदाबाद | - | Vision IAS, आश्रम रोड, अहमदाबाद |
| ११. पुणे | - | MMCC, डेक्कन जिमखाना, पुणे |
| १२. ठाणे | - | आनंद विश्र गुरुकुल, वागळे इस्टेट, ठाणे |
| १३. जळगांव | - | दीपस्तंभ कॅम्पस, कुसुंबा, जळगांव |
| १४. नागपूर | - | MKH संचेती स्कूल, वर्धा रोड, नागपूर |
| १५. भोपाल | - | Vision IAS, हबीब गंज, भोपाल |
| १६. इंदूर | - | तथागत आयएएस, भवरकुआ रोड, इंदूर |
| १७. बेंगलुरू | - | Vision IAS, हम्पी नगर, बेंगलुरू |
| १४. हैदराबाद | - | Vision IAS, RTC क्रॉस रोड, हैदराबाद |
| १९. रांची | - | Vision IAS, सर्कुलर रोड, लालपूर, रांची |
| २०. पटना | - | ए. एन. कॉलेज बोरिंग रोड, श्री कृष्ण पुरी, पटना |

*नोंद: २१ जून २०२६ च्या परीक्षेसाठीची (MPSC/सरळ सेवा) केंद्रांची यादी स्वतंत्रपणे जाहीर केली जाईल.*

**प्रश्न १९: परीक्षेसाठी हॉल तिकीट जारी केले जाईल का?**

- नाही, स्वतंत्र हॉल तिकीट दिले जाणार नाही. मनोबलकडून व्हॉट्सॲप किंवा ईमेलद्वारे मिळालेला परीक्षा केंद्राचा तपशील आणि रिपोर्टिंग सूचनांचा संदेश हाच परीक्षेसाठी अधिकृत हॉल तिकीट / प्रवेशपत्र मानला जाईल. त्यामुळे आपले इनबॉक्स आणि स्पॅम फोल्डर नियमित तपासा.

**प्रश्न २०: परीक्षेच्या दिवशी मी काय सोबत बाळगावे?**

- अनिवार्य (Mandatory): मूळ सरकारी फोटो ओळखपत्र (पॅन कार्ड, पासपोर्ट, मतदार ओळखपत्र, ड्रायव्हिंग लायसन्स इ.). *(नोंद: अधिकृत पडताळणीसाठी वैध भौतिक ओळखपत्र सोबत असणे आवश्यक आहे).*
- लागू असल्यास: अपंगत्व प्रमाणपत्र (Disability Certificate).
- पर्यायी (Optional): रफ कामासाठी कोरे कागद, पेन किंवा पेन्सिल.

**प्रश्न २१: परीक्षेदरम्यान कोणत्या गोष्टींना मनाई आहे?**

कॉपी करणे, इतर उमेदवारांशी बोलणे, तोतयागिरी करणे, अनधिकृत साहित्याचा वापर किंवा लेखकिकाचा गैरवापर केल्यास उमेदवाराला त्वरित अपात्र केले जाईल आणि कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते.

## ७. अधिकृत संपर्क आणि मदत केंद्र

सर्व अधिकृत घोषणा, वेळापत्रक आणि निकालासाठी नियमितपणे या वेबसाइटला भेट द्या:

www.deepstambh.org

संपर्क तपशील

- व्हॉट्सॲप सपोर्ट (प्राधान्य): 9067111597
- ईमेल: admission@deepstambh.org

प्रादेशिक हेल्पलाइन नंबर्स

- जळगाव: 8149730318, 9890406717
- पुणे: 9168660080, 8624837332
- दिल्ली: 9607983508

कॉल करण्याची वेळ: सकाळी १०:०० ते संध्याकाळी ५:०० वाजेपर्यंत (केवळ कामकाजाच्या दिवशी)